**L. A. BILL No. XXXIV OF 2026.**

*A BILL*

TO AMEND THE MAHARASHTRA STATE COMMISSION FOR SCHEDULED CASTES ACT, 2025.

## सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

२०२५ चा महा. ३७.

२०२६ चा महा. अध्या. ३.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २५ मे २०२६ रोजी, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता ;

(शा.म.मु.) एचबी ४७१–१ (१०४०–६-२०२६)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २५ मे २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (ख) मध्ये, "अध्यक्ष" या मजकुरानंतर, ", उपाध्यक्ष" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. (२०२५ चा महा. ३७.)

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(क-१) उपाध्यक्ष, ज्यास सदस्यांमधून नामनिर्देशित करण्यात येईल;".

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. (२०२६ चा महा. अध्या. ३.)

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ (२०२५ चा महा. ३७) हा, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींच्या हिताचे संरक्षण व रक्षण करण्याच्या; आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियमित करण्यात आला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग घटित करण्याची तरतूद केली होती, जो अध्यक्ष व सदस्य यांचा मिळून बनलेला होता. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३८ अन्वये अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य मिळून राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग घटित केला आहे. म्हणून, राष्ट्रीय आयोगाच्या रचनेप्रमाणे राज्य आयोगावर देखील उपाध्यक्ष नियुक्त करणे इष्ट वाटते.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २५ मे २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६ (२०२६ चा महा. अध्या. ३), हा प्रख्यापित केला होता.

**४.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १६ जून, २०२६.

**संजय शिरसाट,**
सामाजिक न्याय मंत्री.

## सन २०२६ चे वि.स.वि.क्र. ३४– महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट

**[महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ यातील उतारे.]**

**(सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७)**

**१.** ** ** **

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्ज आवश्यक नसेल तर,- व्याख्या.

(क) ** ** **

(ख) "सदस्य" याचा अर्थ, या आयोगाचा सदस्य, असा आहे, आणि त्यात अध्यक्ष व सदस्य-सचिव यांचा समावेश होतो;

(ग) ते (च) ** ** **

**३.** ते **२०.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४.]**

**[महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. संजय शिरसाट,**
सामाजिक न्याय मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई